## आतील पानात...

- अर्थसंकल्प पुन्हा..स्वप्नरंजन करणारा..?
- यंदा बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त होणार का ?
- देवखेळ वेबसिरीसजवर तात्काळ बंदी आणावी, गुहागरवासियांची जोरदार मागणी...



दैनिक

# अक्षराज

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे  Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून
निघत असते व जे खूप तीव्र देखील असते,
त्यात खूपच जास्ती
सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...


● वर्ष ०३ रे ● अंक १०३ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, मंगळवार, दि.०३ फेब्रुवारी २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 103 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Tuesday, 03 February 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## निराला बाजारात फिल्मी स्टाईल राडा!

### सिगारेट आणि ५ हजारांसाठी पान टपरीचालकावर पिस्तुल रोखली




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, छत्रपती संभाजीनगर :** संभाजीनगरातून एक फिल्मी स्टाईल घडामोड समोर येते आहे. हा स्टोरी ऐकून तुम्हाला एखाद्या चित्रपटाची स्टोरी वाटेल. पण तसं नाही आहे. हि घडामोड अगदी खरी आहे. खऱ्या जीवनातील आहे.शहरातील गजबजलेला भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निराला बाजार परिसरात एका पान टपरीचालकाला पिस्टल आणि चाकूचा धाक दाखवून लुटल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सिगारेट आणि ५ हजार रुपयांच्या मागणीवरून सुरू झालेला हा वाद थेट प्राणघातक धमकी आणि लुटीपर्यंत पोहोचला. याप्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साहील चांडक, करण गणेश तांदळे रा. दगडगल्ली, औरंगपुरा,जय भांडारकर, रितेश पहाडिया असे आरोपींचे नाव आहे.या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,निराला बाजारमधील अशोका रेस्टॉरंटच्या शेजारी आशिष रामेश्वर काष्टे यांची 'जय भवानी पान सेंटर' नावाची टपरी आहे. १ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास काही तरुण दुचाकीवरून तिथे आले.आरोपी साहील चांडक याने फिर्यादीला धमकावत, करणला ५ हजार रुपये आणि सिगारेट दे, असे सांगितले. मात्र, टपरीचालकाने पैसे देण्यास नकार दिला आणि वादाला तोंड फुटले.

**पिस्टल आणि चाकूचा धाक...**

नकार मिळताच आरोपींचा पारा चढला. आरोपी करण तांदळे याने चाकू काढून तर जय भांडारकर याने थेट पिस्टल (बंदूक) रोखून टपरीचालकाला जीवे मारण्याची धमकी दिली. दिवसाढवळ्या भर वस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

**पैसे हिसकावून घेतले !**

केवळ धमकावूनच आरोपी थांबले नाहीत, तर त्यांनी फिर्यादीला ढकलून देऊन टपरीच्या गल्ल्यातील ७ हजार रुपये रोख आणि सिगारेटची पाकिटे बळजबरीने हिसकावून घेतली. पोलिसात तक्रार केली तर घरच्यांना संपवून टाकू, अशी धमकी देऊन आरोपी दुचाकीवरून पसार झाले.

दरम्यान, अशा पद्धतीच्या गुन्हेगारी घटना या सर्वांसमोरील मोठं आव्हान ठरलं आहे. समाजातील वाढती गुन्हेगारी त्यामागिल कारणे आणि त्यांची मीमांसा हा देखील एक मोठा चर्चेचा विषय बनतो आहे.

## सर्वसामान्यांचा भ्रमनिरास करणारा अर्थसंकल्प – बाळासाहेब थोरात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, संगमनेर (अहिल्यानगर) :** मोदी सरकारने (रविवार दि.१) सादर केलेला अर्थसंकल्प हा देशासम ोरील आर्थिक व सामाजिक संकटांवर उपाय करण्याऐवजी प्रश्न अधिक गंभीर करणारा आहे. या अर्थसंकल्पात गरिबांसाठी कोणताही दिलासा नसून महागाई व बेरोजगारी आटोक्यात आणण्यासाठी ठोस उपाययोजना नाही. अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी असून भ्रमनिरास करणारा असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणी समितीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पाबाबत प्रतिक्रिया देताना माजी मंत्री थोरात म्हणाले, देशामध्ये महागाई, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र हे नियंत्रणात आणण्यासाठी सरकारकडून कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या गेल्या नाही. अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी असून भ्रमनिरास करणारा आहे. ठप्प वेतन वाढ, कमकुवत मागणी आणि खाजगी गुंतवणुकीतील मंदी ही अर्थव्यवस्थेसमोरील मोठी संकटे आहे असे असताना रोजगार वाढवण्यासाठी कोणताही विचार दिसत नाही. वाढत्या कर्जबोजाकडे आणि रुपयाच्या घसरनीकडेही सरकारने दुर्लक्ष केले आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्यायासाठी निधी कमी केला असून गोरगरिबांसाठी या अर्थसंकल्पात कोणतीही विशेष तरतूद नाही. अर्थसंकल्प म्हणजे थकलेल्या व दिशाहीन सरकारचा दाखला असल्याची टीका करताना या अर्थसंकल्पातून मोठमोठे आकडे दाखवले गेले. मात्र जनहिताचा कोणताही विचार नसून पूर्णपणे दिशाहीन अर्थसंकल्प असल्याची टीका त्यांनी केली.

## दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर अखेर भुजबळांनी मौन सोडलं,

# बैठकीमध्ये काय काय ठरलं होतं? सगळं सांगितलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** अजित पवार यांचा भीषण विमान अपघात झाला, या अपघातामध्ये त्यांचं निधन झालं. अजित पवार यांच्या निधनानंतर आता दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासंदर्भात वेगवेगळे दावे करण्यात येत आहेत. बारा तारखेला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होते, असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला होता, शरद पवार यांच्या या दाव्यानंतर चर्चेला उधाण आलं. दरम्यान दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासंदर्भात वेगवेगळे दावे सुरू असतानाच आता भुजबळ यांनी यासंदर्भात बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. प्रत्येक जण आपआपल्या पद्धतीने सांगत आहे, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**नेमकं काय म्हणाले भुजबळ?**

दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्यासंदर्भात एक बैठक झाली होती, त्याचा व्हिडीओ देखील व्हायर झाला होता. त्याच्यामध्ये अशी माहिती सम ोर येत आहे की, सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद द्यायचं, अजित पवार यांनी राज्य सांभाळायचं आणि प्रफुल्ल पटेल व जयंत पाटील यांना कॅबिनेट मंत्रिपद द्यायचं, असं ठरलं होतं अशी माहिती समोर येत आहे, असा प्रश्न यावेळी भुजबळ यांना पत्रकारांनी विचारला, या प्रश्नाला उत्तर देताना भुजबळ यांनी मोठं विधान केलं आहे.

'आता असंही आहे, प्रत्येकजण आपआपल्या पद्धतीने माहिती सांगतो, त्याला पुरावा काय? हे काही माहिती नाही. मला फक्त एवढं माहिती होतं, बारामतीमध्ये कृषी प्रदर्शन होतं, त्यावेळी ही सर्व मंडळी तिथे एकत्रीत



आली होती आणि त्यावेळी जिल्हा परिषदेच्या ज्या निवडणुका आहेत, त्या एकत्रित लढाव्यात, अशा प्रकारचं ठरलेलं होतं, हे मला अजित पवार यांनी सांगितलं होतं. त्या पलिकडे काहीही ठरलं नाही. सगळ्यात म हत्त्वाचा मुद्दा म्हणजे यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे, जर तसं काही असतं तर अजितदादा यांनी मला तसं सांगितलं असतं, माझ्याशी शेअर केलं असतं, असं फडणवीस म्हणाले, असं यावेळी भुजबळांनी सांगितलं.

दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना शरद पवार यांनी असं म्हटलं होतं की, जे या बैठकीला नव्हते, त्यांना काय माहिती, असाही प्रश्न यावेळी भुजबळ यांना विचारण्यात आला, याला देखील भुजबळ यांनी उत्तर दिलं आहे. ही सर्वमंडळी कृषी प्रदर्शनासाठी एकत्र आली होती, त्यामुळे आम्ही तिथे असण्याचं काही कारणच नाही. अजितदादा हे बाराम तीचे असल्यामुळे या कृषी प्रदर्शनाम ध्ये होते.

अचानक तिकडे अशी काही मिटिंग होणार आहे, हेही कोणाला माहिती नव्हतं. आणि जर असं काही घडणार असतं तर तिकडचे दहा –पंधरा माणसं, इकडचे चार –पाच म ाणसं सोबत असताना बैठक घ्यायला पाहिजे होती. मग बोलायला पाहिजे होतं, मला वाटतं आता या सगळ्या संदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार याच निर्णय घेतील, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

# पारनेर बाजार समितीच्या कांद्याला परदेशातून मागणी...

## कांदा वाढविणार आता आखाती देशांमधील पदार्थांची चव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्रात कांदा खरेदी-विक्रीसाठी प्रसिद्ध असलेल्या पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत येणार्या दर्जेदार कांद्याला दुबई व श्रीलंकेतील कोलंबोतून मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी पारनेर बाजार समितीच्या आवारातील कांदा दुबईच्या परदेशवारी निघाला. पाशा ग्लोबल एसपोर्ट कंपनीचे निर्यातदार अब्दुल कादर पाशा यांनी ६ कंटेनरमध्ये १८० टन कांद्याची खरेदी केली आहे. त्यामुळे पारनेरसह श्रीगोंदा, जुन्नर, नगर तालुक्यात पिकणार्या कांद्याला आखाती देशांमध्ये मागणी वाढली आहे. म हाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला पारनेर बाजार समितीतील कांदा परदेश वारीसाठी निघाला आहे.

पारनेर बाजार समितीतील साईबाबा ट्रेडिंगचे प्रकाश भंडारी यांच्या म ाध्यमातून दुबई येथील पाशा ग्लोबल एसपोर्ट कंपनीने कांदा खरेदी केली.



सहा कंटेनरमधून कांदा दुबईला रवाना...

> “पारनेरचा कांदा चविष्ट टिकाऊ आणि गुणधर्मयुक्त असल्यामुळे त्याला परराज्यातून मोठी मागणी असल्याने व्यापारी खरेदी करतात. नगर जिल्ह्यासह पुणे, शिरूर ग्रामीण भागासह संगमनेर, श्रीगोंदा तालुक्यातील कांदा उत्पादकांची पसंती पारनेर बाजार समितीला आहे. श्रीलंका कोलंबो, बांगलादेशसह दुबई व आखाती देशांमध्ये या दर्जेदार व निर्यातक्षम कांद्याला मागणी आहे. त्यामुळे या कांद्याला चांगला बाजारभाव मिळत असून, गेल्या डिसेंबर व जानेवारी या दोन महिन्यांच्या काळात विक्रमी आवक झाली आहे. परदेशात या कांद्याला मागणी असल्याने आनंदाची व कौतुकाची बाब आहे.
>
> **– किसनराव रासकर,**
> **सभापती व सचिव सुरेश आढाव**

या बाजार समितीमध्ये विकणारा कांदा हा दर्जेदार व निर्यातक्षम असल्यामुळे परदेशात याला मागणी असल्याचे सभापती किसनराव रासकर व सचिव सुरेश आढाव यांनी सांगितले. भविष्यात याठिकाणी गोडाऊनची उभारणी करून कांदा खरेदी करण्याचा मानस पाशा ग्लोबल एसपोर्ट कंपनीचे कार्यकारी संचालक अब्दुल कादर पाशा यांनी व्यक्त केला. त्यामुळे भविष्यात पारनेर बाजार समितीच्या माध्यमातून परदेशात कांदा निर्यात केला जाणार आहे.

दुबईच्या कांदा कंटेनर रवाना प्रसंगी बाजार समितीचे संचालक माजी सभापती गंगाराम बेलकर, व्यापारी संघटनेचे तालुकाध्यक्ष मारुती रेपाळे, सचिव सुरेश आढाव, संचालक चंदन भळगट, व्यापारी किसन गंधाडे, एकनाथ पडवळ, चेतन भळगट, राहुल सातपुते, नितीन तामखडे, स्वप्निल भंडारी, रावसाहेब झंजाड, माणिक खोडदे,महादू तोडकर, अक्षय बेलोटे, राजू बेलोटे यांच्यासह व्यापारी उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर बाजार समितीमध्ये कांदा व्यापार करण्याऱ्या ५ ते ७ व्यापाऱ्यांनी परदेशात दर्जेदार व निर्यातक्षम कांदा पाठविण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. या व्यापाऱ्यांवर संचालक मंडळाचा व प्रशासनाचा अंकुश असल्यामुळे बाजार समितीत येणारा कांदा हा जाहीर लिलाव पद्धतीने व पारदर्शक पद्धतीने विक्री केला जात आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना समाधानकारक भाव मिळत आहे. एकीकडे पारदर्शक कारभारामुळे व भाव चांगला मिळत असल्याने विक्रमी आवकेबरोबर परदेशवारी जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

## जलवाहिनी फुटींच्या मालिकेमुळे नागरिक संतप्त,

## महिलांचा पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना घेराव




**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०२, धानोरी (पुणे) :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत धानोरी–कळस–लोहगाव प्रभाग क्रमांक एक तसेच टिंगरे नगर–फ ुलेनगर–नागपूर चाळ प्रभाग क्रमांक दोन परिसरात तब्बल तीन ठिकाणी जलवाहिनी फुटण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनांमुळे सुमारे १५ ते १६ लाख लिटर पाणी वाया गेल्याचा अंदाज असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

टिंगरे नगर विमानतळ रस्त्यावरील गल्ली क्रमांक दोन, विश्रांतवाडी येथील संभाजी महाराज पुतळ्याजवळ तसेच कळस परिसरातील दर्ग्याजवळ जलवाहिनी फुटल्याने रस्त्यांवर पाण्याचे तलाव साचले होते. अनेक तास पाणी वाहत राहिल्याने वाहतूक विस्कळीत झाली, तर घरगुती पाणीपुरवठ्यावरही परिणाम झाला. वारंवार होणाऱ्या जलवाहिनी फुटींच्या घटनांमुळे काम ांच्या दर्जावर आणि देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी यामागे दिरंगाई व दुर्लक्ष असल्याची शंका व्यक्त केली आहे.

दरम्यान, टिंगरे नगर येथील बर्मा सेल परिसरात पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची पाहणी सुरू असताना संतप्त महिलांनी त्यांना चक्क घेराव घातला. तत्काळ पाणीपुरवठा सुरळीत केला नाही तर तुम्हाला येथून जाऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका महिलांनी घेतली. जोपर्यंत नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी महिलांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ निर्णय घेण्याची मागणी करत, अन्यथा थेट कार्यालयात घुसून निषेध व्यक्त करण्याचा इशाराही दिला. पाणीपुरवठा विभागाकडून अद्याप ठोस आश्वासन न मिळाल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, महानगरपालिकेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा आरोपी जेरबंद !

## स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगरची धडक कारवाई...

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०२, संगमनेर :** दि.०१ फेब्रुवारी २०२६ कुरण (ता. संगमनेर) येथून १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीस अहिल्यानगर जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने अटक करून पीडित मुलीची सुखरूप सुटका केली आहे. कलीम अकबर पठाण (वय २२, रा. गल्ली नं. १०, जमजम कॉलनी, संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८६६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीने पीडित मुलीस कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार होती.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी विशेष पथक तयार केले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार विजय पवार, गणेश लोंढे, संतोष खैरे, फ ुरकान शेख, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, महिला पोलीस अंमलदार ज्योती शिंदे व चालक भगवान धुळे यांचा समावेश होता.

तपासादरम्यान आरोपी हा अपहरण केलेल्या मुलीसह झरेकाटी येथून देवगाव मार्गे संगमनेरकडे विनानंबर बजाज प्लॅटिना मोटारसायकलवर येत असल्याची माहिती पथकास मिळाली. त्यानुसार देवगाव रोडवरील सिद्धकला हॉस्पिटलजवळ सापळा रचण्यात आला. आरोपी मोटारसायकलवर येताच




पथकाने त्याला शिताफीने ताब्यात घेतले. महिला पोलीस अंमलदारांच्या मदतीने पीडित मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली.

आरोपीकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची बजाज प्लॅटिना मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. चौकशीत सदर मोटारसायकल आरोपीने त्याचा साथीदार जुनेद युनूस शेख (रा. समनापूर) याच्यासह झोळे (ता. संगमनेर) येथून चोरी केल्याचे निष्पन्न झाले असून या संदर्भात संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात एन.सी.आर. नं. ८१/२०२६ दाखल असल्याची नोंद आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीविरुद्ध संगमनेर शहर, संगमनेर तालुका, शिर्डी व श्रीरामपूर पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे एकूण २१ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. आरोपी, जप्त मुद्देमाल व पीडित मुलीस पुढील तपासासाठी संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास संगमनेर शहर पोलीस ठाणे करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनांनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# संपादकीय

## संत रविदास महाराज : सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ



भारतीय समाजाच्या इतिहासात संतपरंपरेला केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ म्हणून विशेष स्थान आहे. मध्ययुगीन भारतातील सामाजिक विषमता, जातिभेद, धार्मिक कर्मकांड आणि मानवी प्रतिष्ठेचे होत असलेले अवमूल्यन या पार्श्वभूमीवर संतांनी मानवतावादी विचार मांडले. याच संतपरंपरेतील एक तेजस्वी आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा संत म्हणजे संत रविदास महाराज होय. ०१ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एका संताचे स्मरण करण्यापुरती मर्यादित न राहता, भारतीय समाजाच्या समतेच्या संघर्षाचा आणि माणुसकीच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची संधी देते.

संत रविदास महाराजांचा काळ हा सामाजिक अन्यायाने ग्रासलेला होता. जातीनुसार माणसाचे मूल्य ठरवले जात होते. जन्माच्या आधारे शुद्ध-अशुद्ध, उच्च-नीच असे भेद केले जात होते. समाजातील मोठा वर्ग शिक्षण, धर्म, संस्कृती आणि सन्मानापासून वंचित होता. अशा काळात संत रविदास महाराजांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, हा मूलभूत विचार निर्भीडपणे मांडला. त्यांच्या विचारांची धार समाजातील अन्यायकारक रचनांवर थेट प्रहार करणारी होती. संत रविदास महाराजांचा जन्म वंचित समाजघटकात झाला असला, तरी त्यांनी आपल्या जन्माला कधीही मर्यादा मानली नाही. उलट, त्यांनी आपल्या अनुभवांमधून समाजातील विषमतेची तीव्र जाणीव करून घेतली आणि त्याविरुद्ध वैचारिक संघर्ष उभारला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या कर्माने आणि आचरणाने ठरते. हा विचार त्या काळातील सामाजिक व्यवस्थेसाठी क्रांतिकारक होता. अस्पृश्यता ही त्या काळातील समाजाची सर्वांत विदारक समस्या होती. काही माणसांना केवळ जन्मामुळे अपवित्र ठरवले जात होते. त्यांना सामाजिक जीवनापासून दूर ठेवले जात होते. संत रविदास महाराजांनी या अमानवी व्यवस्थेचा तीव्र निषेध केला. ईश्वर जर सर्वांमध्ये आहे, तर एखादा माणूस अपवित्र कसा ठरू शकतो, हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न आजही तितकाच मूलभूत आहे. त्यांच्या विचारांनी अस्पृश्यतेच्या मुळावरच घाव घातला. संत रविदास महाराजांचा संघर्ष केवळ शब्दांपुरता नव्हता. त्यांच्या दैनंदिन आचरणातून समतेचा विचार प्रकट होत होता. त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांशी समानतेने वागणूक दिली.

त्यांच्या सहवासात कोणताही भेदभाव नव्हता. त्यामुळे त्यांच्या आश्रमात आणि त्यांच्या सभोवती समतेचे एक वेगळे सामाजिक विश्व उभे राहिले. समाजातील वंचित घटकांना त्यांच्या सहवासातून आत्मसन्मानाची जाणीव मिळाली. धर्मसत्तेवर केलेली टीका हे संत रविदास महाराजांच्या सामाजिक कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा असावा, तो माणसामाणसांत भिंती उभ्या करणारा नसावा, असा त्यांचा आग्रह होता. कर्मकांड, बाह्य विधी आणि दांभिक धार्मिक आडंबर यांवर त्यांनी कठोर प्रहार केला. त्यांच्या मते खरा धर्म म्हणजे करुणा, परोपकार आणि सामाजिक न्याय तत्त्व आत्मसात सारणे होय. श्रमप्रतिष्ठेचा विचार संत रविदास महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता. शारीरिक श्रम करणाऱ्या वर्गाला समाजात तुच्छ लेखले जात होते. संत रविदास महाराजांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. समाज उभा राहतो तो श्रमिकांच्या कष्टावर, हे त्यांनी ठामपणे मांडले. श्रम करणारा माणूस कमी दर्जाचा नसून तो समाजाचा आधारस्तंभ आहे, हा संदेश त्यांनी आपल्या जीवनातून दिला.

### बजेट

तयार करणे बजेट
तारे वरची कसरत
बजेट हे सर्वांसाठी
जाते कसे विसरत

एका हाताने देतात
दुस-या हाती परत
भोकं पडला घडा
कधी नसतो भरत

आश्वासने कागदी
घोडे नाहीत धावत
आभासी पैसे सारे
खिशात ना मावत

श्ध्दा नाही ज्याले
नवसा नाही पावतं
प्रसादाच्या पंगतीत
बसलो कसे जेवत

विरोधकांची कामे
रहा कायम भिडत
चर्चा चाले बजेटची
एकमेकांवर चिडत

असेवारे काही असे
ठेवी फक्त झुलवत
झोळीअंती रिकामी
आलो हात हलवत

असते जया दानत
त्यानेचंद्यावी दावत
लाडकी राणी खुश
नाराज नीत सवत

--हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# अर्थसंकल्प पुन्हा..स्वप्नरंजन करणारा..?



भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या कारकीर्दीतील नववा अर्थसंकल्प सादर केला.या अर्थसंकल्पाचे एका ओळीत वैशिष्ट्य सांगायाचे झाले तर, दक्षिण भारतातील निवडणूक घोषणापत्र असेच याचे वर्णन करावे लागेल. अर्थसंकल्पातील सर्व संकल्पित प्रस्ताव हे केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगालसाठीचे आहेत. उरला सुरला निधी आणि संकल्पचित्र गुजरातसाठी राखून ठेवला आहे. सर्वसामान्य नोकरदारवर्गाला अर्थसंकल्पातून गेल्या काही वर्षापासून कोणतीच अपेक्षा राहिलेली नाही. ना कमाई वाढत आहे ना प्राप्तीकराची सवलत वाढत आहे. त्यामुळे आलेला रुपया जाणार तो साठवण्यासाठी, वाढवण्यासाठी कोणतीही तरतूद निर्मला सीतारामन करत नाहीत. शेअर बाजार एक हजार अंकांनी कोसळला. रविवारी अर्थसंकल्प सादर होत असल्यामुळे विशेष सत्रासाठी बाजार सुरू करण्यात आला होता. मात्र पडझडीसह बंद झाला. सीतारामन यांनी अर्थसंकल्पात फ्युचर आणि ऑप्शनवरील सिक्युरिटीज ट्रॅन्झक्शन टॅक्स वाढवण्याची घोषणा केल्याचा हा परिणाम होता. यामुळे गुंतवणूकदारांमध्ये नाराजी पसरली. गेल्या सहा वर्षांमध्ये बजेटच्या दिवशी झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे. यावरुन या बजेटवर ना गुंतवणूकदार खूश आहेत, ना नोकरदार अशी स्थिती आहे.

पंतप्रधान मोदींनी आपलीच पाठ थोपटून घेत, अपार अवसरो का राजमार्ग, वर्तमान स्वप्नांना साकार करणारा अर्थसंकल्प, भारताच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी सशक्त करणारे बजेट. २०४७ च्या उंच उड्डाणाचा मजबूत आधार हा अर्थसंकल्प असल्याचे सांगितले. हातात रंगाचे डबे घेऊन फिरणाऱ्या या सरकारने नावे बदलण्याशिवाय या १२ वर्षांत काहीही केले नाही, हेच या अर्थसंकल्पातून दाखवून दिले. पुन्हा एकदा सी प्लेनचे स्वप्न रंगवण्यात आले. याआधी यासाठी २० कोटी दिले होते, याचाही विसर आता सरकारला पडलेला दिसतो. विमा क्षेत्राला काही विशेष सवलतींची इच्छा होती. आरोग्य विमादेखील एक प्रकारची बचत आहे. याचा विचारच निर्मलाताईंनी केला नाही.

अमृत सरोवर योजना २०२० मध्ये घोषित करण्यात आली होती. प्रत्येक जिल्ह्यातील तलावांची स्थिती तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहू शकता. गेल्या सहा वर्षांत तुम्ही तिथे फिरायला गेला नसाल तर आता एकदा जाऊन पाहाच. स्मार्ट सीटी योजना कधीकाळी आली होती, याचाही आता लोकांना विसर पडला असेल, असे गृहीत धरुन मोदी सरकारच्या मंत्री सीतारामन यांनी पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि टियर-३ शहरांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्याची घोषणा केली. जनतेला स्वप्न दाखणे काही वाईट नाही, पण दिवास्वप्न दाखवणे अजून शिक्षेस पात्र नाही म्हणून ठिक आहे.निर्मलाताईंनी एक महत्त्वाकांक्षी




योजना आणली आहे. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी वसतीगृह उभारण्याची घोषणा केली गेली. लाडक्या बहिणींसाठीची ही योजना जर

सत्यात उतरवली गेली तर नक्कीच त्यातून नवा भारत घडण्यास मदत होईल. घोषणा तर केली, आता गरज आहे अंमलबजावणीची. या योजनेची स्मार्ट सिटी होऊ नये एवढीच अपेक्षा. बेरोजगार, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या आवाक्याबाहेरचे हे बजेट आहे. देशात कमी झालेल्या उत्पादकतेकडे लक्षच देण्यात आलेले नाही. २०१४ मधील मेक इन इंडिया आणि २०१५ च्या स्किल इंडियाचे पुढे काय झाले? आता कर्तव्याच्या काही गोष्टी निर्मलाताईंनी केल्या, मात्र त्यांनाच त्यांच्या कर्तव्याची आठवण करुन देण्याची जनतेवर वेळ आली आहे. २०२४ च्या अर्थसंकल्पात सीतारामन यांनी सांगितले होते की, ५० लाखांपेक्षा कमीचे आणि तीन वर्षे जुने प्रकरण असेल तर त्यासाठी पुन्हा हे प्रकरण सुरू होणार नाही. चौकशीची मुदत १० वर्षांवरुन ६ वर्षे करण्यात आली होती. याचा अर्थ भारतातील कॉर्पोरेट जगत २०१९ पासून टॅक्स सूट मिळवत आले. एकूण कर उत्पन्नात कॉर्पोरेट तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर प्रत्यक्ष कर भरणारे सामान्य नागरिक पहिल्या क्रमांकावर आहेत. ८० टक्के कर सामान्य नागरिक देत आहेत. म्हणजेच कॉर्पोरेट वर्ग करही भरत नाही आणि गुंतवणूकही करत नाही अशी स्थिती आहे. सामान्य नागरिकच कराचा भार वाहत आहे, त्याला कोणतीच सूट नाही. कॉर्पोरेटसाठी मात्र मित्र नेमला जाणार आहे. उत्पादन क्षेत्रात भारत आशिया खंडात सहाव्या क्रमांकावर आहे. चीन सर्वात पुढे. गेल्या १२ वर्षांत चिनी सामानावर बहिष्काराच्या पोकळ घोषणांशिवाय उत्पादन निर्मितीत भारताने चीनला धोबीपछाड सोडा चपराकही लगावलेली नाही. अवघ्या १२ वर्षांतच भाजप सरकारमध्ये नाविन्याचा अभाव दिसून आला आहे. त्याच योजना नव्या नावाने आणल्या जात आहेत. संकल्प से सिद्धी, विकसित भारत, आत्मनिर्भर भारत असे वेगवेगळे भारताचे स्वप्न दाखवले जाते. प्रत्यक्षातल्या भारतात तुम्ही आम्ही रोजच लोकलचे धक्के खात आहोत. सात हायस्पीड रेल्वेची घोषणा करण्यात आली.

आता मुंबईकर, पुणेकर हैदराबादी बिर्याणी हायस्पीडने जाऊन चाखू शकणार आहेत. २० नव्या जलमार्गाची सुरुवात केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. २०१६ पासून हे स्वप्न दाखवले जात आहे. मात्र ते प्रत्यक्षात आलेले नाही. या बजेटमध्ये सर्वाधिक निधीची तरतूद परिवहन मंत्रालयासाठीच करण्यात आली आहे. यातील किती महामार्ग हे गुजरातमध्ये होणार आणि आगामी विधानसभा निवडणूक असलेल्या केरळ, तामिळनाडूतून जाणार, या राज्यात भूमीपूजन सोहळे होणार यावरुन स्पष्ट होईलच. पण सामान्य जनतेनेही लक्षात घेण्याची गरज आहे की, स्वप्न किती काळ पाहायचे. कारण मोदी सरकारला सत्तेत येऊन १२ वर्षे होऊन गेली आहेत, आता मागील सरकारला दुषणे देणे आणि सर्व जबाबादारी पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंवर ढकलून नामानिराळे होता येणार नाही. अर्थसंकल्पाची एकूणच स्थिती पाहता आहे त्यातच चालवा आणि चित्ताला समाधानी ठेवा,असेच म्हणावे लागेल.कागदावरील अर्थसंकल्प जोपर्यंत जमिनीवरील वस्तुस्थिती बदलू शकत नाही तोपर्यंत तरी ते केवळ स्वप्नरंजनच ठरते.

**हा अर्थसंकल्प पुन्हा स्वप्नरंजन करणारा आहे की काही ठोस बदल घडविणारा हे येणारा काळच सांगेल..!!**

# यंदा बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त होणार का ?

राज्यात बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते. शिवाय या दोन्ही परीक्षा नेहमीच्या शाळा आणि महाविद्यालयांत न होता या परीक्षांसाठी अन्य केंद्रात जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांवर अपरिचित वातावरणात परीक्षा देण्याचा ताणही असतो. परीक्षा काळात समस्त परिक्षाकेंद्रात पोलीस शिपाई नियुक्त केले जातात, कॉपी करण्याच्या प्रथेवर आळा घालण्यासाठी शासनाचे भरारी पथक कार्यरत असते. शाळेतील पर्यवेक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असते. यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत. परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत अशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात येणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री स्वतः जातीने लक्ष घालत आहेत. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे.

या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लुप्त्या शोधून काढतात. दरवर्षी परीक्षाकाळात प्रतिदिन यासंदर्भातील बातम्या वाचायला मिळतात. काही ठिकाणी आपल्या शाळेचा निकाल चांगला लागावा यासाठी पर्यवेक्षक शाळेतील मुलांना पुस्तके पुरवतात. काही ठिकाणी तर बोर्डाच्या परीक्षेच्या काळात ठराविक कमिशनच्या मोबदल्यात थेट बाकापर्यंत कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय



झालेल्या पाहायला मिळतात. या मंडळींनी पोलिसांपासून शाळेच्या पर्यवेक्षकांनाही 'मॅनेज' केलेले असते. बोर्डाच्या परीक्षेकरिता एका बाकावर एकच विद्यार्थी बसवण्याची सक्ती असताना परीक्षा केंद्रांमध्ये २ विद्यार्थ्यांना एकाच बाकावर बसवून एकमेकांच्या संगनमताने पेपर सोडवण्याची अनुमती दिली जाते. काही ठिकाणी पेपर सोडवण्याचा कालावधी संपण्याच्या काही मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची, एकमेकांना उत्तरे विचारण्याची अनुमती दिली जाते. काही शाळांमध्ये शाळेच्या खिडक्यांबाहेर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणाऱ्यांची जत्रा भरलेली असते. यांना पोलीसही हटकण्याची तसदी घेत नाहीत. काही विद्यार्थी तर कॉपी करण्यात अगदीच पटाईत असतात त्यांना इतका आत्मविश्वास असतो कि ते परीक्षेसाठी कधीही अभ्यास न करता मिळालेला संपूर्ण वेळ कॉपी तयार करण्यामध्ये घालवतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून काही ठिकाणी पर्यवेक्षक स्वतःच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगतात किंवा कॉपी करण्याची खुली अनुमती देतात. सरकारने यंदा ज्या पद्धतीने सिद्धता केली आहे ते पाहता यंदा कॉपी करण्यावर बऱ्याच प्रमाणात आळा बसेल असे म्हणण्यास हरकत नाही.

मुलांचे वय हे संस्कारक्षम असते. लहान वयात होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य ठरवत असतात. शालेय जीवनात परीक्षेत कॉपी करून उत्तीर्ण होण्याची सवय जडलेले महाभाग पुढील आयुष्यातही यश मिळवण्यासाठी 'शॉर्टकट'चा किंवा गैरमार्गाचा अवलंब करू पाहतात. पौगंडावस्थेत असतानाच कॉपी करण्याची सवय लागल्याने भविष्यात असे करण्यात काही चुकीचे आहे असेही त्यांना कधी वाटत नाही. कॉपी केल्यामुळे आपण परीक्षा उत्तीर्ण होऊ मात्र पुढील व्यवहारिक जीवनात परीक्षेचे प्रसंग हे पदोपदी येणार आहेत त्यावेळी आपल्या बुद्धिमत्तेची आणि विवेकाची कसोटी लागणार आहे, तेव्हा आपल्याला कोण साहाय्य करणार ? कॉपी करणे म्हणजे निव्वळ आपल्या स्वार्थासाठी गैरमार्गाचा अवलंब करणे. कॉपी करणे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे आणि नेटाने अभ्यास केला आहे त्यांच्यावर अन्याय करणे. कॉपी करणे म्हणजे स्वतःला गुन्हेगारीची सवय लावून घेणे. कॉपी करणे म्हणजे मेहनतीला डावलून शॉर्टकट शोधण्याची सवय अंगीकारणे . वर्षभर अभ्यास करून परीक्षेला आनंदाने सामोरे जाणे ही नैतिकता आहे, तर वर्षभर उनाडक्या करून ऐन परीक्षेच्या काळात अभ्यास झाला नाही म्हणून कॉपी सारख्या गैरमार्गाचा अवलंब करणे ही अनैतिकता आहे. परीक्षेचे पेपर सोडवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करण्याची सवय विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात भ्रष्टाचाराने आणि गैरमार्गाने धन कमावण्याची सवय लावते. गुन्हेगारी क्षेत्रात विद्यार्थ्यांचे आणि उच्चशिक्षितांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शाळांमध्ये नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे मध्यंतरी अनिवार्य करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली कि मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज पुण्यतिथी मात्र आज त्यांची पुण्यतिथी आहे हे किती लोकांना माहीत आहे हा संशोधनाचा विषय आहे. कित्येकांना हे नाही माहितही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, ९९२२५४६२९५**

# मालमत्तेचे व्यवहार करताय? तोतया मालकांपासून सावधान !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, मुंबई :** तोतया व्यक्तींना पुढे करून बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करण्याचे प्रकार घडत असून, या पार्श्वभूमीवर जनसामान्यांनी मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक यांनी केले आहे.

एका तोतया व्यक्तीने स्वतःला मूळ मालक म्हणून दर्शवत बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्तनोंदणी केल्याचा गंभीर



प्रकार अंधेरी येथील सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात २९ जानेवारी रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वतःला सलाउद्दीन आदम नाईक या मूळ मालकाच्या जागेवर भासवणारे मोहम्मद रफीक मोहम्मद इलियास यांच्याविरुद्ध जूहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सह जिल्हा निबंधक कार्यालयात मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री, गहाणखत, बक्षीसपत्र, हक्कसोडपत्र, पॉवर ऑफ ॲटर्नी, करारनामे, विकसन करारनामे आदी सामान्य नागरिकांची कामे नियमित स्वरूपात मोठ्या प्रमाणात केली जातात. भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीद्वारे मूळ मालकांची फसवणूक होऊ नये यासाठी नागरिकांनी कोणतेही व्यवहार करतांना जागरुकता बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक रमेश पगार यांनी केले आहे.

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदानाकरिता ७ फेब्रुवारीस भरपगारी सुट्टी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.

यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.

अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या - पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या - अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

# पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' निमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, पनवेल :** सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये आज दिनांक ०२ जानेवारी २०२६ रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा विभाग व इतर विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते. या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

"नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवाद वाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे १५ दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे असे महापालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे."

### * जाहीर नोटीस *

याव्दारे जाहीर आवाहन करण्यात येते की, अर्जदार श्रीमती. रसिका जयेंद्र पाटील, पत्ता- मुंना पनवेल रोड, उत्तर शिव पडले, ता.जि.ठाणे यांनी त्यांची मुलगी कु. दिव्या जपेंद्र पाटील जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नारिवली यांचे अभिलेखात केली नसल्याने कु.दिव्या जयेंद्र पाटील जन्माची नोंद करणेकामी ग्रुप ग्रामपंचायत नारिवली यांना आदेश देणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज केला आहे.

भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म व मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ मध्ये कलम ११ (२) व (३) मध्ये सुधारणा करुन जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी फोजदारी प्रक्रीया संहिता १९७३ कलम २३(२) अन्वये या कार्यालयास अधिकार प्रधान केले आहेत. तरी प्रकरणी कु.दिव्या जयेंद्र पाटील यांचे जन्माची नोंद करण्याच्या अनुषंगाने आदेश पारीत करणेकामी कोणाचे आक्षेप / हरकत असल्यास १५ दिवसाच्या आत या कार्यालयात कार्यालयीन वेळी स्वतः अगर कायदेशीर सल्लागारासह तसेच आवश्यक त्या पुराव्यासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**क्र.महसूल/कक्ष-१/ज.मृ.नोंद-१/टे-३/**
**कावि-६२०६/२५**
**तहसीलदार कार्यालय, ठाणे**
**दिनांक: ०३/०२/२०२६**

**सही**
**(उमेश पाटील)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे**

# अजितदादांची शिस्तप्रिय व कामाचा माणूस अशी ओळख - आमदार दाते

## पारनेर येथे शोकसभा व अस्थिकलशाची मिरवणूक; अजितदादा अमर रहे..अमर रहे च्या घोषणा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे समाजासाठी मोठे योगदान राहिले असून पारनेरला त्यांनी नेहमीच विकासासाचे झुकते माप दिले. स्वच्छतेला अतिशय महत्त्व देणारा नेता म्हणून ते परिचित होते. शिस्तप्रिय आणि कामाचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती. बारामतीला त्यांनी शिक्षणाची माहेरघर उभे केले. त्या ठिकाणची शैक्षणिक संस्थेच्या इमारत या दादांच्या कामाची साक्ष देतात. पारनेरच्या विकासात पवार कुटुंबाचे मोठे योगदान आहे.




सुप्याची एमआयडीसी त्यांच्या योगदानामुळेच निर्माण झाली अजितदादा आपल्यात नसले तरी त्यांचे विचार हे आपल्यात आहेत त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी यापुढील काळात आपण सर्वांनी मिळून काम केले पाहिजे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे. दोन्हीही राष्ट्रवादी एकत्र होण्यासाठी दोन्हीही पक्षांचे नेते एकत्र बसतील ते ठरवतील सध्या केवळ अफवा आहेत. चांगला पक्ष आपल्याला उभा करायचा आहे असे मत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

पारनेर येथे स्वर्गीय अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारनेर जिल्हा बँकेच्या सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, पारनेर तहसीलदार गायत्री सौंदणे, जी.एस महानगर बँक अध्यक्षा गीतांजली शेळके, सुमनताई दाते, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, भाजप नेते विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, माजी नगराध्यक्ष विजय औटी, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.

यावेळी अहिल्यानगर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी दादांचा अस्थि कलश पारनेर येथे आणला रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी हा असती कलश पिंपळनेर येथे आणण्यात आला व त्यानंतर तो पारनेर शहरात सोमवारी सकाळी १० वाजता दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी पारनेर शहरातून स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे मिरवणूक काढण्यात आली व त्यांना विनम्र अभिवादन आले. या शोक सभेमध्ये व मिरवणुकीत पारनेर तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांतील व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते सर्वपक्षीय नेते महिला भगिनी प्रशासनातील अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

पारनेर येथे आयोजित शोक सभेला यावेळी पारनेर नगरसेवक युवराज पठारे, युवा नेते दिलीप दाते, पारनेर दूध संघाचे अध्यक्ष संदीप ठुबे, पारनेर खरेदी विक्री संघाचे चेअरमन दत्तात्रय रोकडे, रिपाइं तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे, माजी सभापती गणेश शेळके, माजी जि. प. सदस्य वसंत चेडे, ॲड. युवराज पाटील, उद्योजक धनंजय निमसे, विकास रोकडे, अमोल रोकडे, ॲड. पांडुरंग गायकवाड, माजी सरपंच संजीवनी आंधळे, राष्ट्रवादी नेते पंढरीनाथ उंडे, सरपंच मनोज मुंगसे, सरपंच संजय काळे, सरपंच डॉ.विलास काळे, इंद्रभान गाडेकर, सागर मैड, नगरसेवक अशोक चेडे, कांतीलाल ठाणगे, दत्तानाना पवार, सरपंच लहू भालेकर, माजी सरपंच बाळासाहेब रेपाळे, शेतकरी नेते अनिल देठे, जयसिंग कर्डिले, साहेबराव वाफारे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर सुधामती कवाद, कविता औटी, सोनाली सालके, जयश्री शिंदे, बाबासाहेब नऱ्हे, जेष्ठ नेते अरुण घनवट, अजिंक्यतारा दरेकर, सुभाष दुधाडे, आदी सर्वपक्षीय नेते यावेळी उपस्थित होते.

---

स्व. अजितदादा हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी काम करणारा नेता होता त्यामुळे महाराष्ट्र पोरका झाला त्यांच्यासारखा आक्रमकपणे काम करणारा नेता गेल्यामुळे जनता दुःखात आहे. जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले हे मोठे दुःख आहे.

**- डॉ.श्रीकांत पठारे (तालुकाध्यक्ष शिवसेना (उबाठा), पारनेर)**

---

अजितदादांच्या जाण्याने ही मोठी धक्कादाय घटना आहे. राज्यात नवे तर देशात हळळ व्यक्त होत आहे. कामाचा अवका असणारा नेता गेला जनतेच्या कामासाठी झटणारे व भल्या पहाटे कामाची सुरुवात करणारे तळागाळातील जनतेची जाण असणारे कामाचे सूक्ष्म नियोजन व लक्ष देणारे नेतृत्व आपल्यातून गेले हे मोठे दुःख आहे. कामाला लागा एकजुटीने राहा ही शिकवण अजितदादा पवार यांनी नेहमीच दिली. गुलाबराव शेळके व उदयदादा शेळके व अजित दादांचे सबंध हे खूप प्रेमाचे होते.

**- गीतांजली शेळके (अध्यक्षा, जी.एस. महानगर बँक)**

---

# देवखेळ वेबसिरीसजवर तात्काळ बंदी आणावी; गुहागरवासियांची जोरदार मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०२, गुहागर :** समाजातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा त्याचबरोबर कोकणच्या लोककला संस्कृतीवर भाष्य करणारी झी ५ मराठी ओटीटीवर नुकतीच रिलीज झालेली देवखेळ ही वेबसीरीज वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे, कोकणात प्रामुख्याने गुहागर तालुक्यात देवखेळ्यांना फार महत्व प्राप्त असून यातील संकासुराला गुहागर सह संपूर्ण कोकणात देवाचे स्थान दिले जाते. परंतु झी ५ (शश ५ )च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर २१ जानेवारी २०२६ रोजी रिलीज झालेल्या वेबसीरीजच्या टीझर मध्ये संकासुर देवाला क्रूर,अमानवी आणि अंधश्रद्धेशी जोडून शंकासुर शिक्षा करतो, बळी घेतो, होळीत दरवर्षी खून करण्याची प्रथा आहे अशा संवादांमुळे भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याबाबत 'आपलं गुहागर' या संस्थेने सक्रिय भूमिका घेत संस्थेच्या वतीने ॲड.संकेत साळवी (आपलं गुहागर'चे समन्वयक) यांनी २८ जानेवारी २०२६ रोजी गुहागर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून तक्रारीत भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाईची मागणी करण्यात आली आहे. असे असतानाही सदर वेबसिरीज ३० जानेवारी रोजी झी ५ या मराठी ओटीटीवर रिलीज करण्यात आल्याने येथील नमन लोककलेतून ग्रामदैवतांच्या देवखेळी परंपरा जोपसणारे गाव मंडळ, नागरिकांमधून




मोठया प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे. येथील विविध संस्था आणि नागरिकांनी श्रद्धास्थान संकासुर देव यांच्या चुकीच्या चित्रणाबाबत हरकत घेतल्याने मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावरून टीझर आणि ट्रेलर काढून टाकण्याबरोबरच देवखेळ ही वेबसीरीज रिलीज करण्यात येऊ नये अशा मागणीने जोर धरला आहे.



### ट्रेलरला आतापर्यंत ८० लाखांहून अधिक व्ह्यूज

अडूर येथील ग्रामस्थ/ कलाकार सहज सोलकर यांच्या माहितीनुसार चित्रीकरण दरम्यान संकासुरावर डॉक्युमेन्ट्री करत आहोत असे अडूर ग्रामस्थांना खोटे सांगून चित्रीकरण करण्यात आले असल्याची माहिती समोर आली असून ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल. आज सदर वेबसिरीज मध्ये कोकणातील प्रामुख्याने गुहागर मध्ये जोपसलेल्या देवखेळी परंपरेला झी ५ (नशश ५) मराठीने संकासूर बाबत चुकीचे चित्रीकरण करून समस्त गुहागर सह कोकण वासियांच्या भावना दुखावल्याच्या संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

ॲड.संकेत साळवी यांच्या तक्रारीनुसार,झी ५ (नशश ५) च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर २१ जानेवारी २०२६ रोजी रिलीज झालेल्या ट्रेलरला आतापर्यंत ८० लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाल्याने हा आक्षेपार्ह मजकूर देशभरात प्रसारित झाला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांना निवेदन

या प्रकरणी आता गुहागर विधानसभा आमदार भास्करराव जाधव यांनी महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांना निवेदन दिले असून निवेदनात म्हटले आहे की संकासूर हे कोकणातील शिमगा उत्सवातील एक भक्तीमय, पौराणिक आणि पारंपारिक पात्र असून, त्याला शिवाचा अवतार मानले जाते. काळ्या रंगाचा पोशाख, मुखवटा व हातात वेत घेऊन गोमूसोबत गावागावात फिरणारा संकासूर गावकऱ्यांना आशीर्वाद देतो. ही केवळ करमणूक नसून, कोकणची शेकडो वर्षांची श्रद्धा व सांस्कृतिक परंपरा आहे.

सदर बाबत गुहागर पोलीस ठाणे ते जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, काळाच्या ओघात अनेक पारंपारिक कला लोप पावत असताना, कोकणातील कुणबी समाजाने नमन, भजन, संकासूरसारख्या कला जपून जगासमोर नेल्या आहेत. अशा कलांना बदनाम करण्याचा प्रयत्न या वेबसिरिजच्या माध्यमातून होत असल्याने जनभावना दुखावल्या गेल्या आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले. सदर प्रकरणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सिनेमास्टर्स प्रोडक्शन प्रा. लि. निर्मित 'देवखेळ' या वेबसिरिजवर तात्काळ बंदी घालावी अशी ठोस मागणी आमदार भास्कर जाधव यांनी केली आहे.

त्यामुळे सदर प्रकरणी झी ५ (नशश५ )तसेच संबंधित निमर्त्यांकडून जनभावनेचा आदर केला जाईल अशी येथील नागरिक आशा व्यक्त करत आहेत, असे असले तरी सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच स्थानिक प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दशश्री माळी हॉल येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे सर्वपक्षीय शोकसभा संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०२, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल पालघर येथील दशश्री माळी हॉल येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेला विविध राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, माजी पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत नेत्यास श्रद्धांजली अर्पण केली.



या शोकसभेस राष्ट्रवादी कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार), भारतीय जनता पक्ष, शिवसेना, कॉंग्रेस आदी सर्वच पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी दादांच्या जाण्याने आज राष्ट्रवादी कॉंग्रेसचा परिवार विस्कळीत झाला आहे. पक्षाचा आधार हरपला आहे. ज्या वेगाने आणि कर्तृत्वाने अजितदादांनी राष्ट्रवादी परिवार पुन्हा एकत्र आणण्याचे स्वप्न पाहिले होते, ते स्वप्न दुर्दैवाने अधुरेच राहिले, अशी भावनिक प्रतिक्रिया राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पालघर जिल्हाध्यक्ष आनंदभाई ठाकूर यांनी व्यक्त केली.

अजितदादा हे प्रशासनावर पकड असलेले, निर्णयक्षम आणि रोखठोक बोलणारे नेते होते, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष भरत राजपूत यांनी व्यक्त केले.तर शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे यांनी देवत्व प्राप्त झालेले नेतृत्व आपण गमावले असून ही न भरून येणारी हानी आहे, अशा शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

या सर्वपक्षीय शोकसभेस राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष आनंदभाई ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, नगराध्यक्ष राजेंद्र माच्छी, कॉंग्रेसचे सरचिटणीस सत्यम ठाकूर, माजी आमदार अमित घोडा, माजी नगराध्यक्ष मिहीर शहा, युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष करण ठाकूर, माजी नगराध्यक्ष रवींद्र फाटक, समीर वैद्य, पांडुरंग बेलकर, विनायक बारी, हरेश मुकणे, जगदीश राजपूत, जिल्हाध्यक्ष रोहिणीताई शेलार, पंचायत समिती सदस्य स्वाती राऊत आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

तसेच नगरसेविका जिल्हाध्यक्ष कीर्ती मेहता, विपुल राऊत, तन्मय बारी, अमित नहार, हेमंत धर्ममहेर, नगरसेवक शमी पीरा, सईद शेख, सुरेंद्र अण्णा पाटील, संतोष देशमुख, हितेंद्र पाटील, पिंकी नहार, विजय म्हात्रे, संजय पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती नोंदवली.

शोक सभेदरम्यान उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी अजितदादांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. एकूणच ही सर्वपक्षीय शोकसभा अत्यंत शांत, गंभीर आणि भावनिक वातावरणात पार पडली.

# महापौर, उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा. होणा-या नवी मुंबई महानगरपालिका महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी आज १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत महापालिका सचिव श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांचेकडे नामनिर्देशनपत्रे



दाखल करण्यात आलेली आहेत. महापौर पदासाठी होणाऱ्या निवडणुकीकरिता श्रीम.सरोज रोहिदास पाटील आणि श्रीम. सुजाता सुरज पाटील यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे. तसेच उपमहापौर पदासाठी होणा-या निवडणुकीकरिता आकाश बाळकृष्ण मढवी आणि दशरथ सिताराम भगत यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे. महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सभा होणार आहे.

# केंद्र सरकारचा अर्थसंकल्प म्हणजे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक

## शेतकरी संघटनेचा आरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** केंद्र सरकारचा अर्थसंकल्प म्हणजे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची थेट आणि उघड उघड केलेली फसवणूक आहे. कधीतरी शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव वाढले की क्षणात कांदा निर्यातबंदी, निर्यातीवर कर आणि विविध अटी, शर्ती लादून शेतकऱ्यांचं उत्पन्न गळा दाबून रोखायचे. गेल्या अनेक महिन्यांपासून कांद्याला अत्यल्प बाजारभाव मिळत असल्यानं कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. कांद्याला



मातीमोल भाव मिळतो आहे. तेव्हा या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कवडीचीही तरतूद नाही. हा अर्थसंकल्प शेतकरीविरोधी मानसिकतेचा जिवंत पुरावा आहे. केंद्र सरकारनं कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पूर्णपणे वाऱ्यावर सोडलं, असा आरोप असा आरोप महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केले आहेत.

कर्जाच्या ओझ्याकडं जाणीवपूर्वक डोळेझाक : शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाकडं, वाढत्या मजुरीकडं, खत-बियाण्यांच्या महागाईकडं आणि कर्जाच्या ओझ्याकडं सरकारनं जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे. भाव नियंत्रणाच्या नावाखाली नेहमीच शेतकऱ्यांना बळी देणाऱ्या सरकारनं आज कांदा उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम केलं आहे. हा अर्थसंकल्प नाही, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अपेक्षांची जाहीर हत्या आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाची किंमत शून्य मानणाऱ्या या धोरणाविरोधात कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. जर केंद्र सरकारनं तत्काळ कांदा उत्पादकांसाठी थेट आर्थिक तरतूद, हमी भाव आणि निर्यात धोरणात स्थैर्य दिलं नाही, तर हा संताप रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा ही महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी दिला आहे.

# शिळफाटा जंक्शन नाका येथे किरकोळ वादातून भरदिवसा ऐकाची हत्या

## शिळ-डायघर पोलिसांनी २ तासात ३ ही आरोपींना ठोकल्या बेड्या

**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.०१, शिळफाटा (ठाणे)** : दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास रिगल हॉटेलच्या बाजूला, शिळफाटा ता.जि.ठाणे येथे इसम नामे सैफअलि खान याने तक्रारदार महमंद शेख यास चारचाकी व्हगॅनोर कार क्रमांक एम.एच ०२ जी.एच ९३६७ ही डिपॉझीटची रक्कम घेवून व प्रतिदिन भाडे ठरवून चालविणे करिता दिलेली होती. सदरचे वाहन तक्रारदार यांनी परत दिले होते. परंतु आरोपी डिपॉझीटची रक्कम परत देत नव्हता. यावरून त्याच्यामध्ये वाद निर्माण झाल्याने सैफ अली खान याने डिपॉझीटची रक्कम तकारदार यास परत देण्याकरीता बोलाविले असता सदर रक्कम स्विकारणे करीता तक्रारदार महमंद शेख व त्याचे मित्र अबुतालीब, सचिन व अमन शेख यांच्यासह सदर



ठिकाणी आले असता सैफअलि खान हा शोएब खान व आरिफ खान यांच्यासोबत चारचाकी कार क्रमांक एम.एच ०२ जी.एच ९३६७ हीने सदर ठिकाणी आला. त्यावेळी त्याच्यात वाद होवून शिवीगाळ व हाताने धक्काबुक्की झाली. तेव्हा आरिफ खान याने अमन शेख याचे दोन्ही हात पाठीमागुन पकडले त्यावेळी सैफअली खान व शोएब खान याने त्याच्या जवळील धारदार चाकूने त्याच्या छातीवर जोराने वार करून त्याचा खुन केला आहे. तसेच अबुतालीब हा त्यास वाचवण्याकरीता गेला असता त्यांच्या डाव्या हातावर कोपराखाली चाकुने दुखापत केली त्या तिघांनी तक्रारदार यांचे जबरदस्तीने अपहरण करून 'अभि इसका भी काम कर डालते है' असे धमकावुन त्यांनी मारहाण केली व तक्रारदार योच खिश्यातील ५०००/-रूपये रोख असे जबरदस्ती काढुन घेतले म्हणून इसम नामे १) सैफअली निजामउद्दीन खान वय २९ वर्षे, २) शोएब निजामउद्दीन खान वय २० वर्षे, ३) आरिफ आताउल खान वय २८ वर्षे, सर्व राहणार सध्या डोबिंवली, मानपाडा (पूर्व) यांच्या विरोधात तक्रारदार महमंद शेख याचे तकारी वरून शिळ डायघर पोलीस ठाण्यात गु. रजि. नं. ६६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), १४० (१), ११५(२), ११८ (१), ३०९ (६), ३५१ (३), ३(५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे नमूद आरोपीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला, मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिळ-डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांनी आरोपीचा शोध तपासकामी अधिनस्त अधिकारी अंमलदार यांचे दोन तपास पथके तयार केली. गुन्हयाचा तपास चालू असताना गुप्त बातमीदार व तांत्रीक तपासाच्या आधारे आरोपीचा कसोशीने शोध घेवुन सदर गुन्हयात आरोपी नामे १) सैफअली निजामउद्दीन खान वय २९ वर्षे, २) शोएब निजामउद्दीन खान वय २० वर्षे, ३) आरिफ आताउल खान वय २८ वर्षे, सर्व राहणार सध्या डोबिंवली, मानपाडा (पूर्व) यांना देसाई गांव येथून ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातील जिवेठार मारण्याच्या उददेशाने अपहरण केलेला तक्रारदार महमंद शेख याची सुटका करून त्याचा जिव वाचविला शिळ डायघर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा कसोशीने तपास करुन सदर गुन्हयातील आरोपीतांना सदर गुन्हयात २ तासात आरोपीनी गुन्हयात वापरलेली मोटार कार व हत्यारांसह अटक करून खुनाचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा उघडकीस आणून स्तुत्य अशी कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगिरी आशुतोष डुंबरे पोलीस आयुक्त ठाणे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण पोलीस सह आयुक्त, विनायक देशमुख मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे, सुभाषचंद्र बुरसे पोलीस उपआयुक्त परि. १ ठाणे, प्रिया डमाळे सहा.पोलीस आयुक्त कळवा विभाग, श्रीराम पौळ वपोनि शिळ-डायघर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस टीमचे कारवाई केली आहे.

# बापाचं स्वप्न लेकीनं केलं पूर्ण;

## भानेगावची जिद्दी कन्या गेमिनी जगने आता सीमेवर बजावणार कर्तव्य

**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.०२, नागपूर :** स्वप्न पाहणाऱ्यांच्या पंखांना जर कष्टाचं आणि जिद्दीचं बळ मिळालं की, आभाळ ही ठेंगणं पडतं हे भानेगावच्या गेमिनी मोतीलाल जगने या २२ वर्षीय तरुणीने सिद्ध करून दाखवले आहे. घरची परिस्थिती बेताची आणि पितृछत्राचे दुःख पचवून गेमिनीने सीमा सुरक्षा दलात (BSF) कॉन्स्टेबल पदावर धडक मारली असून संपूर्ण भानेगाव परिसरात कौतुकाचा वर्षाव होत आहे.उपासे ले आउट भानेगाव वार्ड क्रमांक १ येथे राहणाऱ्या गेमिनीचे शिक्षण बी.कॉम.पर्यंत झाले. लहानपणापासून गेमिनी ला खाकी वर्दीचे आकर्षण होते.

गेमिनीला सीमा सुरक्षा दलात जायचं होतं तिचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेमिनीचे वडील मोतीलाल जगने स्वतः पहाटे मैदानावर सरावासाठी तिला घेऊन जात होते. मात्र, यादरम्यान तिच्या वडिलांचा मृत्यू झाला.

याप्रसंगी गेमिनी खचली नाही, उलट माझ्यासाठी वडिलांनी बघितलेलं स्वप्न पूर्ण करायचेच हा निश्चय केला. आई वंदना, भाऊ धीरज व मेघेष यांनी तिला खंबीरपणे साथ दिली. गेमिनीने महागडे क्लास लावले



माझ्या मुलीने केवळ आमच्या कुटुंबाचेच नाही तर समाज व संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. तिने घेतलेली अपार मेहनत आज सार्थकी लागली गेमिनीचे वडील आज हयात असते तर नक्कीच त्यांना आपल्या लेकीचा अभिमान वाटला असता.
**– वंदना जगने (आई)**

भानेगाव सारख्या ग्रामीण भागातील मुलीने घेतलेली ही गगनभरारी इतर मुलींसाठी प्रेरणादायी आहे. जिद्द असेल तर परिस्थितीवर मात करता येते हे गेमिनी ने दाखवून दिले. आम्हाला गावाच्या लेकीचा सार्थ अभिमान आहे.
**– शालिनी अनेश चवरेसरपंच, भानेगाव**

नाही. केवळ स्वबळावर अभ्यास केला. अखेर १५ जानेवारी ला जाहिर झालेल्या 'एसएससी जीडी' परीक्षेत तिची कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली. गेमिनीच्या या ऐतिहासिक यशाबद्दल भानेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. सरपंच शालिनी अनेश चवरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन तिला सन्मानित करण्यात आले. यावेळी कॅप्टन सुरेश प्रसाद मिश्रा, श्यामराव सरोदे, डोमाजी निखाडे, अनेश चवरे यांच्यासह उपसरपंच सोनू बोरकर, ग्राम पंचायत सदस्य दर्शना बोरकर, कमलेश भास्कर, पुष्पा जालंदर, अश्विनी अभ्यंकर, मंगला पांडे, अरविंद तांडेकर, नितीन चव्हाण, मीना उके, सरस्वती तांडेकर, सीमा चिकनकर, सोनाली बागडे व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व.दत्ता पाटील स्मृती चषक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला वैजनाथवॉरियर्स संघ वरसई



**अक्षराज : मितेश जाधव**
**दि.०१, पेण (रायगड)** : पेण पुर्व विभागातील वरसई फाट्यावर भव्यदिव्य क्रीडांगणावर वरसई विभाग प्रीमियर लीग २०२६ स्व.दत्ता पाटील स्मृती चषकचे आयोजन जय भवानी मित्र मंडळ जावळी यांच्या माध्यमातून दिनांक ३० ते ३१ जानेवारी व रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी या तीन दिवस क्रिकेट सामन्यांचे भव्यदिव्य असे आयोजन करण्यात आले होते.

सदर वरसई विभागातील प्रसिद्ध व मनाची स्पर्धा स्व दत्ता पाटील स्मृती चषक स्पर्धेचे उद्घाटन बाल गंगा संघर्ष समिती अध्यक्ष अविनाश पाटील, कृ, उ बाजार समितीचे संचालक जयवंत नारकर, जोमा दरवडा, चंद्रकांत होजगे यांच्या हस्ते करण्यात आले होते. स्व.दत्ता पाटील स्मृति चषक व वरसई विभाग प्रीमियर लीग स्पर्धेत १) स्वर्गीय रोहन दख फ्रेंड्स क्लब २) वैजनाथवॉरियर्स वरसई ३) ओवी दख जावळी ४) बाबदेव दख जांभूळवाडी ५) भोराई दख वाशिवली ६) दुर्वा दख करोटी७) श्री. काळेश्री गावडोशी ८) साईश दख गागोदे ९) अंश दख १०) श्री.कालभैरव गावडोशी असे दहा संघ मालकानी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या तीन दिवस स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. रविवारी फायनल स्पर्धा पाहण्यासाठी क्रिकेट प्रेमीचा उत्साह वाढला होता. रविवारी अंतिम सामना चुरशीचा झाला त्यात सामन्यामध्ये वैजनाथवॉरियर्स संघ विरुद्ध बाबदेव दख जांभूळवाडी दरम्यान झाला त्यामध्ये प्रथम फलंदाजी करताना वरसई संघाने ५ षटकात ६ बाद ६२ धावा रचल्या व त्यास प्रत्युत्तर देताना बाबदेव जांभूळवाडी संघ ५२ धावात ७ बाद होतं पराजित झालाया अत्यंत चुरशीच्या सामन्यात वैजनाथ वॉरियर्स वरसई संघ ठरला प्रथम क्रमांकाचा मानकरी तर बाबदेव जांभूळवाडी संघ ठरला उपविजेता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक वैजनाथ वोरियर्स संघ वरसई

संघास ५० हजार- रुपये आणि भव्य चषक युवा उद्योजक मंदार पाटील, अविनाश पाटील, यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. तर उपविजेता क्रमांक ३० हजार रुपये- आणि भव्य चषक बापदेव जांभुळ वाडी संघास चंद्रकांत होजगे, जयवंत नारकर, लक्ष्मण दिवेकर, मंगेश पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. त्याचप्रमाणे उत्कृष्ट फलंदाज अंकित बेकावडे यास कुलर आकर्षक चषक देण्यात आले तर उत्कृष्ट गोलंदाज सनी वाघ यास कुलर व आकर्षक चषक तसेच उत्कृष्ट क्षेत्ररक्षक राज चौधरी यास आकर्षक चषक देण्यात आले तर मालिकावीर मारुती आघान यास श्रशव टीव्ही बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेला शुभेच्छा देण्यासाठी अविनाश पाटील, चंद्रकांत होजगे, जयवंत नारकर, युवा उद्योजक मंदार पाटील, सामाजिक कार्यकर्ते वासुदेव पाटील, उपसरपंच जावळी राजेश पाटील, आर सी पाटील, वाकरूळ सरपंच गणेश गायकर, जाभिवली उपसरपंच सुजित दळवी, जोमा दरवडा, लक्ष्मण दिवेकर तसेच या तीन दिवसीय सामन्यामध्ये पंच म्हणून महेंद्र फाटक, राजू पाटील, प्रवीण आंद्रे, गुणलेखक जनार्दन नागले, समालोचक वामन दरवडा, हरेश पाटील, मानस मनोरे, अक्षय पाटील, स्वप्निल पवार विविध राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजकांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. वरसई विभाग प्रीमियर लीग २०२६ क्रिकेट स्पर्धा पार पडण्यासाठी वरसई विभागातील क्रिकेट प्रेमीने तसेच जावळी गावातील तरुण युवकांनी मोलाचे सहकार्य केले.

# डहाणू - तलासरीतील कला क्रीडा मोहत्सवाला सुरुवात खेळाडूंना नवे बळ

## दोन क्रीडा संकुलांपैकी एकास मंजुरी - आमदार निकोले

**अक्षराज : निलेश कासट**
**दि.०२, डहाणू (पालघर) :** डहाणू - तलासरी तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागात असंख्य गुणवंत खेळाडू दडलेले असून, त्यांना योग्य संधी व सक्षम व्यासपीठ मिळाल्यास ते राज्य व देशपातळीवर नक्कीच आपली छाप पाडतील, असे ठाम प्रतिपादन आमदार कॉ. विनोद निकोले यांनी केले. चार दिवसीय डहाणू - तलासरी तालुका कला - क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डहाणू व तलासरी तालुक्यासाठी दोन स्वतंत्र क्रीडासंकुल उभारण्यात येणार असून, त्यापैकी एक क्रीडासंकुलास शासनाची मंजुरी मिळाल्याची माहिती आमदार निकोले यांनी दिली. या क्रीडासंकुलांमुळे तालुक्यातील खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होतील आणि त्यांच्या क्रीडा कौशल्यांना अधिक वाव मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डहाणू-तलासरीतील खेळाडूंच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असल्याचेही त्यांनी ठासून सांगितले.

आमदार विनोद निकोले यांच्या सौजन्याने आयोजित या भव्य कला-क्रीडा महोत्सवातून पुढील चार दिवस तालुक्यातील शेकडो खेळाडूंना आपले कर्तृत्व सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या महोत्सवाचे अध्यक्ष स्थान ही आमदार निकोले यांनी भूषविले.




प्रांताधिकारी सत्यम गांधी यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळालाही तितकेच महत्त्व देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अशा प्रकारचे क्रीडा महोत्सव शिस्तबद्ध, सक्षम व दर्जेदार खेळाडू घडवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी आमदार निकोले यांनी क्रीडाक्षेत्रासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. ग्रामीण व आदिवासी भागातील खेळाडूंना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा महोत्सव दिशादर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी आमदार निकोले म्हणाले, डहाणू - तलासरी तालुक्यासाठी दोन क्रीडा संकुलाची नितांत गरज आहे. त्यापैकी एकास मंजुरी मिळाली आहे. भविष्यात खेळाडूंवर अधिक लक्ष केंद्रित करून सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. क्रिकेटसह सर्व खेळांना समान संधी देत योग्य मार्गदर्शन व मदत मिळवून देण्यासाठी कोणत्याही स्तरावर सहकार्य घेण्यास मी मागेपुढे पाहणार नाही. लोक मला गरीबांचा आमदार म्हणतात. ही ओळख माझ्यासाठी अभिमानाबरोबरच मोठी जबाबदारी आहे. या जबाबदारीतूनच तालुक्यातील खेळाडूंना पुढे नेण्यासाठी आयुष्यभर प्रयत्नशील राहीन, असे भावनिक उद्गार काढत त्यांनी उपस्थितांच्या टाळ्यांचा कडकडाट मिळवला.

'गरुड झेप' घेणारी नवी क्रीडापिढी घडवण्याचा उद्देश या महोत्सवामागे असून, डहाणू-तलासरीच्या क्रीडा इतिहासात हा महोत्सव महत्त्वाचा मैलाचा दगड ठरेल, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला प्रांताधिकारी विशाल खत्री, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, तहसीलदार सुनील कोळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता फणसे, पोलीस निरीक्षक किरण पवार, नगराध्यक्ष राजेंद्र माच्छी, अखिल भारतीय किसान सभेचे राज्य कार्याध्यक्ष चंद्रकांत गोरखाना, माजी नगराध्यक्ष नंदू हाडळ यांच्यासह विविध मान्यवर, क्रीडा शिक्षक, खेळाडू व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# पोंभुर्णा तालुक्यातील चिंतलधाबा गाव ठरणार राज्याचा ऊर्जा स्वालंबनाचे आदर्श मॉडेल

**अक्षराज: अरुण कुत्तरमारे**
**दि.०२, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** पोंभुर्णा तालुक्यातील चिंतलधाबा गाव १०० टक्के सौर ग्राम म्हणून विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे.

राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे चिंतलधाबा सौर ग्राम प्रकल्पासाठी एक कोटी ५६ लक्ष ४० हजार रुपयांचा निधीश प्रशासकीय मान्यता मिळाली आहे मिळाली आहे. अवघ्या २ महिन्याच्या आत गावकऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण करत आमदार मुनगंटीवार यांनी हा निधी मंजूर करून घेतल्याने परिसरात समाधान व्यक्त केले जात आहे. चिंतलधाबा गावाला पूर्णता सौर उर्जेवर आधारित करण्यासाठी प्रत्येक घरावर सौर पॅनल बसविण्यात येणार आहे. यासाठी मंजूर झालेल्या निधीमुळे गावातील वीज समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार असून ऊर्जा स्वालंबनाच्या दिशेने गावाची भक्कम वाटचाल सुरू होणार आहे.

चंद्रपूर जिल्हाधिकारी यांनी या निधीस प्रशासकीय मान्यता



दिली असून यामुळे प्रकल्प प्रत्यक्ष साकार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामुळे ग्रामीण भागात स्वच्छ शाश्वत आणि किफायतशीर ऊर्जेचा वापर वाढणार आहे. सौर ऊर्जेमुळे गावकऱ्यांचे वीज बिल कमी होणार असून पर्यावरण पूरक ऊर्जेचा लाभ ही मिळणार आहे. चिंतलधाबा गाव राज्याचा ऊर्जा स्वालंबनाचे आदर्श मॉडेल ठरेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्र सौरऊर्जेचे राज्यात अग्रस्थानी राहावे. या उद्दिष्टाने आमदार सुधीर मुनगंटीवार सातत्याने प्रयत्न करत आहेत. यापूर्वी मुल तालुक्यातील उथळ पेठ गाव १०० टक्के सौरग्राम म्हणून विकसित करण्यात आले आहे. त्यानंतर आता चिंतलधाबा गावाचा या योजनेत समावेश झाल्याने बल्लारपूर विधानसभेत ऊर्जा स्वावलंबनाचा आदर्श अधिक बळकट होत आहे. दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी चिंतलधा बा येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या भूमिपूजन कार्यक्रमात आमदार मुनगंटीवार यांनी गावातील वीज समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १०० टक्के सौर ग्राम करण्याचा निर्धार जाहीर केला होता. त्यानंतर महावितरणाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन निधी मंजुरीसाठी पाठपुरावा करण्यात आला. अवघ्या दोन महिन्यात निधी प्रशासकीय मान्यता मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये उसाचे वातावरण आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सुरज घर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ऊर्जा स्वालंबन पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांना वीज बिलातून दिलासा देण्याचा संकल्प देशभर राबवला जात आहे. ज्यात दूरदृष्टी पूर्ण संकल्पनेतून प्रेरणा घेत चिंतलदाबा गाव महाराष्ट्रातील आदर्श १०० टक्के सौर ग्राम म्हणून ओळख निर्माण करेल असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात बातम्या

# भेलोशी पंचक्रोशी शोक सागरात; श्वेता धारशे यांचे दुःख निधन



**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.०१, भेलोशी (महाड) :** महाड तालुक्यातील भेलोशी गावचे रहिवाशी, सामाजिक कार्यकर्ते, भेलोशी ग्रामस्थ मंडळाचे सचिव तसेच कलगी तुरा समाज उन्नती मंडळाचे सरचिटणीस संतोष धारशे यांच्या धरम पत्नी कै. श्वेता संतोष धारशे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने ठाणे येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी दुःख निधन झाले. कै.श्वेता धारशे यांच्या अचानक जाण्याने भेलोशी, नडगाव, संपूर्ण पंचक्रोशीवर शोककला पसरली आहे. या अत्यंत दुःख बातमीमुळे सामाजिक, कलाक्षेत्रात हळहळ व्यक्त केले जात असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. सायंकाळी ५.४५ वाजता भेलोशी येथील स्मशान भूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्व.श्वेता धारशे (जयश्री(जयाताई)) या नडगाव गावचे चे शाहीर/वस्ताद देवजी कदम यांच्या त्या कन्या होत्या. माहेरवाशीण म्हणून सर्वांची लाडकी जयाताई नडगाव गावच्या प्रत्येक कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेत सक्रिय होऊन योगदान देत असत, तेवढ्याच हिरगिरीने त्या भेलोशी गावच्या सणात, उत्सवात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. होळी,गणपती,सप्ताहअशा प्रत्येक कार्यक्रमात भेलोशी गावच्या विविध उपक्रमात त्या अग्रेसर असायच्या. सामाजिक,कलाक्षेत्रात कार्यरत असणारे पती संतोष धारशे यांना नेहमीच त्यांचा खंबीर पाठींबा असायचा, त्यांना दोन मुले साईराज,साई, सासू-सासरे असा परिवार आहे. गावात, समाजात हळवी नाती जपणारी भेलोशी गावची सक्रिय कार्यकर्ती कै. श्वेता संतोष धारशे यांच्या अचानक जाण्याने गावात भरून न येणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे. भेलोशी ग्रामस्थ मंडळ -मुंबई/ग्रामीण, वरची आळी ग्रामस्थ मंडळ-भेलोशी, सोमसाई नृत्य कला मंडळ भेलोशी,विभग फाउंडेशन, कलगी तुरा समाज उन्नती मंडळ (मुंबई), नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र (भारत) तसेच सामाजिक/कला/क्रीडा/राजकीय स्तरातून कै. श्वेता धारशे यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.त्यांचे पुढील अंतिम विधी सातवे : शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी, दशक्रिया: सोमवार दिनांक ०९ फेब्रुवारी, उत्तर कार्य: बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी गावच्या राहत्या घरी मु.भेलोशी, ता.महाड, जि.रायगड या ठिकाणी होतील.

# रॉंग साईड वाहतुकीवर कडक कारवाई

## १०२ वाहनांवर दंड, ७२ हजार २५० रुपये वसूल

**अक्षराज : प्रमोद डफळ**
**दि.०२, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर - मनमाड महामार्गाचे काम सुरू असल्याने राहुरी शहरात एकेरी वाहतूक व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र, गर्दीच्या वेळी काही वाहनचालकांकडून रॉंग साईडने वाहने चालवून वाहतूक कोंडी निर्माण केली जात असल्याने राहुरी पोलीस स्टेशन वाहतूक विभागाच्या वतीने कडक कारवाई करण्यात आली. दि.०२ फेब्रुवारी २०२६ रोजी रॉंग साईडने वाहने चालविणाऱ्या एकूण १०२ वाहनांवर कारवाई करून ७२ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या ४ बसांचा समावेश आहे.

यापूर्वी देखील एसटी महामंडळाच्या ७ बसांनी रॉंग साईडने वाहतूक कोंडी केल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई करून संबंधित विभागास पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, आज पुन्हा ४ एसटी बस चालकांनी रॉंग साईडने बस उभी करून वाहतूक कोंडी केल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित चालकांवर कारवाई करण्यात आली असून विभागीय कारवाईसाठी महामंडळास पुन्हा पत्र पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, नागरिकांनी आपली वाहने केवळ एकेरी लेनमध्येच चालवावीत व कोणत्याही परिस्थितीत रॉंग साईडने वाहने आणू नयेत, अन्यथा वाहतूक कोंडीसह दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल, असे आवाहन राहुरी पोलीस स्टेशन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. ही कारवाई सोमनाथ घारगे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, सोमनाथ वाकचौरे अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, जयदत्त भवर उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे (राहुरी पोलीस स्टेशन) तसेच वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, रमेश दरेकर व बापू फुलमाळी यांनी केली.

# स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ करिता नवी मुंबई महानगरपालिका सज्ज

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.०२, नवी मुंबई :** 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' विषयी स्वच्छ भारत मिशनच्या वतीने 'मार्गदर्शक तत्वे (Toolkit)' जाहीर करण्यात आलेली असून त्यांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करावयाच्या कार्यवाहीचा आढावा महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत घेतला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे आणि इतर विभागप्रमुख, अधिकारी उपस्थित होते. कृती आराखडयात नमूद बाबींच्या अनुषंगाने स्वच्छ सर्वेक्षणामध्ये केवळ गुणांकनाकरिता नाही तर केलेल्या कामाचे आपल्याला संपूर्ण समाधान मिळेल अशाप्रकारे नियमीत स्वच्छता कामे हाती घ्यावीत व स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक यांच्यापासून ते उच्च अधिका-यांपर्यंत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करुन द्यावी असे निर्देश आयुक्तांनी दिले. याविषयी माहितीपुस्तिका तयार करुन ती प्रत्येक घटकाला उपलब्ध करुन द्यावी असेही त्यांनी सूचित केले. या वर्षीपासून स्वच्छ भारत मिशनच्या वतीने 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमांतर्गत देशातील १९६ शहरांना मार्गदर्शन करण्यासाठी एकूण ७२ मार्गदर्शक शहरांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये समाविष्ट नवी मुंबई महानगरपालिका शहरास महाराष्ट्र राज्यातील लोणार, केज, मलकापूर, जिंतूर, कन्नड - या ५ नगरपरिषदा स्वच्छ शहर जोडीमध्ये देण्यात आलेल्या आहेत. या स्वच्छ शहर जोडी असलेल्या ५ शहरांकरिता नवी मुंबई महानगरपालिकेचे ५ नोडल अधिकारी नेमण्यात यावेत आणि त्यांनी आगामी २ महिन्यात या शहरांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना स्वच्छतेतील प्रगतीबाबत मार्गदर्शन करावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या. त्यानंतर स्वत: आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उच्चस्तरीय अधिकारी या शहरांना भेट देतील असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.